## ३०. बाळंतपण :गावात किंवा उपकेंद्रात बाळंतपण करायचे? मग एवढ्या गोष्टी बघूनच करा! बाळंतपण करतानाही लक्ष ठेवा ! :

(बाळंतपण)

| तपासणीतले महत्वाचे मुद्दे | तपशिल |
|---|---|
| **अ) आईची तब्बेत कशी आहे?** | |
| १. रक्तदाब | वरचा रक्तदाब १४० पेक्षा जास्त नाही ना? तो ९० पेक्षा कमी नाही ना? खालचा रक्तदाब ९५ पेक्षा जास्त नाही ना? असे असल्यास रुग्णालयात पाठवावे. |
| २. रक्त कमी, रक्तपांढरी? | गरोदरपणात रक्तद्रव्याचे प्रमाण ११ पेक्षा कमी असल्यस त्याला आपण रक्तपांढरी म्हणतो. मात्र रक्तद्रव्याचे प्रमाण ८ पेक्षा कमी असल्यास गावात बाळंतपण धोक्याचे. यापैकी काहीही असल्यास पुढे पाठवा. |
| ३. इतर कोठला मोठा आजार? | खूप ताप, कावीळ, पायावर अंगावर सूज, हृदयाचा आजार, मधुमेह वगैरे आजार नाही ना? असे असल्यास रुग्णालयात पाठवावे. |
| **ब) तातडीचा काही धोका नाही ना?** | |
| ४. योनिमार्गे रक्तस्त्राव | बाळंतपणाच्या सुरूवातीस थोडा रक्तशेंबटा जातो, तेवढा सोडा. मात्र खूप रक्तस्त्राव, तेही न दुखता याचा अर्थ वार चुकीच्या ठिकाणी आहे. हॉस्पिटलला पाठवा. या बाळंतपणात धोका आहे. |
| ५. रक्तदाब खूप कमी, गर्भाशय दुखते, खूप वेदना ? | गर्भाशयात आतल्या आत रक्तस्त्राव झाला असेल असा रक्तस्त्राव थोडाफार योनिमार्गेही दिसू शकतो. बाळ दगावण्याची शक्यता तर आहेच, पण आईलाही धोका आहे. लगेच रुग्णालयात पाठवा. सोबत तुम्हीही जा. |
| ६. गर्भारसूज | अतिरक्तदाब, खूप डोकेदुखी, नजर अंधुक होणे. अशा स्त्रीला हॉस्पिटलमधे पाठवावे. |
| ७. झटके | गर्भारसुजेचाच हा पुढचा दुष्परिणाम आहे. सत्वर हॉस्पिटलला पाठवून द्या. |
| **क) बाळाचा कोणता भाग खाली जन्मवाटेकडे आहे? खालील कारणाने अवघड बाळंतपण असल्यास पुढे पाठवून द्या.** | |
| ८. डोके, ढुंगण की आडवे मूल? | एका हाताने ओटीपोट तपासा (पावलिक म्हणजे एक हाती पद्धत). डोके खाली असेल तरच गावात बाळंतपण करा, इतर काही असल्यास रुग्णालयात पाठवून द्या. |
| ९. डोके खाली आहे खरे, पण मान ताठ आहे की पुढे वाकलेली? | बाळ बाहेर येते ते डोके पुढे झुकवूनच, मस्तक जेवढे पुढे झुकलेले तेवढे बरे.<br>१. बाळाचे डोके अजून जर पोटावरच लागत असेल तर डोक्याचे मागचे टेंगूळ चाचपून बघा. मागचे टेंगूळ कपाळाच्या तुलनेत खाली असल्यास मान चांगली वाकली आहे असा अर्थ. मात्र मागचे टेंगूळ कपाळाच्या मानाने खाली असल्यास मान ताठ आहे असा अर्थ निघतो. ताठ मान म्हणजे अवघड बाळंतपण.<br>२. बाळाचे डोके जन्मवाटेत शिरले असल्यास योनिमार्गातून तपासा. बोटांनी मस्तकाची मागची व पुढची टाळू चाचपून कोणती वर व कोणती खाली आहे ते पहा. मागची टाळू त्रिकोणी तर पुढची चौकोनी असते. चौकोनीपेक्षा त्रिकोणी टाळू खाली आलेली असेल तर चांगले, उलट असल्यास अवघड. |
| १०. चेहरा किंवा हनुवटी? | योनिमार्गातून तपासल्यावर हाताला चेहरा किंवा हनुवटी लागत असल्यास बाळंतपण फारच अवघड जाणार आहे. शस्त्रक्रियाही लागेल. |
| ११. हात,पाय, ढुंगण यांपैकी काही हाताला लागते काय? | खालून तपासताना बाळाचे ढुंगण, पाय, हात यापैकी काही हाताला लागत असल्यास बाळंतपण फारच अवघड आहे. रुग्णालयात पाठवून द्या. |
| १२. नाळ हाताला लागते काय? | खालून तपासताना डोक्यावर नाळेचा भाग लागल्यास धोका आहे असे समजा. अशावेळी नाळ चेपते व बाळ गुदमरते. ताबडतोब रुग्णालयात पाठवून द्या. पाठवताना आईला पायथा उंच करून, कुशीवर झोपवून न्या. |

| तपासणीतले महत्वाचे मुद्दे | तपशिल |
|---|---|
| **ड) बाळ सुरक्षित आहे ना?** खालीलपैकी धोका आढळल्यास वेळीच पुढे पाठवून द्या. | |
| १३. बाळाचे हृदयाचे ठोके | बाळाचे हृदयाचे ठोके १२०–१६० या मर्यादेत असलेले बरे. कळ नसताना ठोके तपासा. ठोके १२० पेक्षा कमी, १६० पेक्षा जास्त असल्यास धोका संभवतो. |
| १४. पाणमोट फुटल्यावर पाण्याचा रंग तपासा. | हिरवा रंग म्हणजे बाळाच्या 'शी' चा रंग. पोटात बाळाच्या तब्बेतीचा धोका असेल तर ते शी करते. पाणी हिरवे पण पातळ असल्यास हा त्रास आत्ताआत्ताचा असणार. हिरवे पण घट्ट पाणी असल्यास त्रास पूर्वीपासून आहे. हिरवा रंग असल्यास रुग्णालयात पाठवा. पण वेळेचा अंदाजही घ्या. रुग्णालयात पोचायला वेळ लागणार असेल तर थांबून बाळंतपण करा. पण बाळाचे श्वसन ––––– |
| **ड) जन्मवाट ठीक रुंद आहे ना?** जन्मवाट अरुंद असल्यास वेळीच पुढे पाठवून द्या. यासाठी खालील गोष्टी पहा. | |
| १५. आईची उंची कमी? | आईची उंची १४५ सेमी.पेक्षा कमी असल्यास जन्मवाट अरुंद असण्याची शक्यता असते. बाळ देखील तेवढ्या प्रमाणात लहान नसेल तर अडचण येते. |
| १६. जन्मवाटेवर डोके किती बसते याचा अंदाज घ्या | बाळाचे डोके एका हाताने जन्मवाटेवर दाबा, दुसऱ्या हाताचा अंगठा जघनसंधीवर (केसाळ भागावरचे हाड) ठेवून बाळाचे डोके जन्मवाटेपेक्षा लहान आहे की मोठे याचा अंदाज घ्या. अंगठ्याला डोके लागत असेल तर ते मोठे आहे. अंगठ्याला डोके लागत नसल्यास ठीक. |
| १७. जन्मवाटेचा बाहेर जाण्याचा भाग (निवेश) रुंद आहे का? (प्रत्येकाचे हाताचे माप थोडे निरनिराळे असते हे लक्षात ठेवा.) | आतून तपासा.<br>१. बोटाला जन्मवाटेच्या पाठभिंतीचा कण्याचा उंचवटा लागतो काय? उंचवटा लागत असल्यास वाट अरुंद आहे. जघनसंधी ते कण्याचा उंचवटा यात ११.५ सेमी इतके अंतर असते. बोटाने त्याचा अंदाज लागतो.<br>२. जन्मवाटेच्या बाजूच्या भिंतीमधे हाडाचे टोक लागते. दोन बोटे V आकारात फाकवून दोन्हीबाजूची टोके एकाचवेळी लागतात का ते पहा. वाट रुंद असल्यास लागत नाहीत. अरुंद असल्यास एकाच वेळी लागतात.<br>३. ढुंगणाच्या दोन हाडांमधोमध आपली मूठ बसते का ते पहा. मूठ सहज बसत असल्यास वाट रुंद असते. मूठ बसत नसल्यास वाट अरुंद आहे. |
| १८. बाळाच्या कवटीची हाडे एकमेकावर सरकलीत काय? | कवटीची हाडे एकमेकावर थोडी सरकून डोके थोडे निमुळते होते व डोके बाहेर पडणे सोपे जाते. कळ असताना तपासल्यास हाडे एकमेकावर सरकलेली लागतात. मात्र कळांच्या आगेमागेही हाडे एकमेकावर चढलेली असल्यास जन्मवाट जास्तच अरुंद आहे असा अर्थ होतो. हे बाळंतपण अवघड जाईल. |
| **इ) गर्भाशयाच्या कळा ठीक आहेत काय? (दर तासाला दहा मिनिटे हात लावून अंदाज घ्या.)** कळा कमी किंवा अपुऱ्या असल्यास कळांचे औषध (ऑक्सीटोसीन) देणे आवश्यक असते. नाहीतर पुढे पाठवून द्या. | |
| १९.कळा खऱ्या की खोट्या? | बाळंतपणाची इतर चिन्हे दिसत नसल्यास, एनिमा देऊन पहा. खऱ्या कळा याने वाढतात तर खोट्या कळा थांबून जातात. |
| २०. कळा किती वेळा येतात? | दहा मिनिटात दोन पेक्षा कमी असल्यास कळा कमी आहेत. ३–४ असल्यास ठीक. |
| २१. कळा किती वेळ टिकतात? | ४० सेकंदापेक्षा जास्त टिकणारी कळ चांगली. २० सेकंदापेक्षा कमी टिकणारी कळ हलकी, तर २०–४० सेकंद टिकणारी मध्यम असे समजा. |
| **ग) बाळाचे डोके खाली सरकते आहे काय?** बाळाचे डोके खाली उतरत नसल्यास रुग्णालयात पाठवून द्या. | |
| २२. गर्भाशयाच्या तोंडाशी चुंबळ सपाट होणे महत्वाचे. | गर्भाशयाचे तोंड हाताने तपासा. प्रगती ठीक असल्यास चुंबळ सपाट/ चपटी होऊन कडा अगदी पातळ होतात. |
| २३. गर्भाशय मुख सैल आहे? | बाळाचे डोके नीट उतरत असेल तर गर्भाशयाची चुंबळ डोक्याला बिलगलेली असते. डोके उतरत नसेल तर चुंबळ डोक्यापासून मोकळी मोकळी राहते. |

| तपासणीतले महत्वाचे मुद्दे | तपशिल |
|---|---|
| २४. गर्भाशयाचे तोंड नीट उघडते आहे काय? | १. सुरुवातीचे ४-६ तास गर्भाशयाची चुंबळ हळूहळू ३ सेमी. पर्यंत उघडते.<br>२. नंतरचे ४-६ तास चुंबळ वेगाने - तासाला १सेंमी. उघडते. पूर्ण उघडल्यावर (१०सेमी.) त्याची पातळ कड लागते व नंतर तीही बाजूला जाते. यापेक्षा जास्त वेळ लागल्यास धोका संभवतो. |
| २५. डोके अजून ओटीपोटावर किती लागते? | ओटीपोटावर चार बोटे लावून, डोके किती वर राहिले याचा अंदाज घ्या. गर्भाशयाचे तोंड वेगाने उघडायला लागते तेंव्हा डोकेही खाली सरकते. गर्भाशयाचे तोंड पूर्ण उघडतेवेळी डोके बोटभरच वरती लागते. |
| २६.डोके कुठपर्यंत खाली आले आहे ते खालून तपासा. | आतून तपासताना जन्मवाटेत बाजूला हाडांचे उंचवटे लागतात, त्या रेषेपर्यंत डोके आले म्हणजे 'शून्य स्टेशनवर'आले असे म्हणतात. या पातळीच्या वर व खाली मणके असतात. त्याप्रमाणे डोक्याचे स्टेशन -३,-२,-१ किंवा +१,+२,+३ या स्टेशनवर आले आहे असे म्हणण्याची पद्धत आहे. परत परत तपासल्यावर डोक्याची 'गाडी' पुढे सरकते आहे की नाही ते कळते. |